आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२९ जानेवारी २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रयागराज महाकुंभात चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेत अनेक जखमी/ दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केलं दुःख

- ‘इस्रो’नं केलं उपग्रह घेऊन जाणाऱ्या  शंभराव्या अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण

- वक्फ सुधारणा विधेयकाविषयी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीचा मसुदा अहवाल मंजूर

- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू / काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध

**आणि**

- आयसीसीचे कार्यकारी प्रमुख ज्योफ अलार्डीस पदावरुन पायउतार होणार

**<><><><><>**

प्रयागराज महाकुंभातल्या परिस्थितीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लक्ष ठेवून आहेत, त्यांनी वेळोवेळी आपल्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली, असं उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज सांगितलं.  उत्तरप्रदेशात मधल्या प्रयागराज इथं सुरु असलेल्या कुंभमेळ्यात मौनी अमावस्येनिमित्त आज अलोट गर्दी झाली आहे. त्यातल्या आखाडा मार्गावर लावलेली फाटकं ओलांडताना काल रात्री अनेक जण जखमी झाले. जखमींना तातडीनं रुग्णालयात उपचारांसाठी हलवलं असल्याचं आदित्यनाथ यांनी सांगितलं. या चेंगराचेंगरीत जखमी झालेल्यांची नक्की संख्या समजू शकली नाही मात्र सुमारे २५ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत असल्याचं हिंदुस्थान

समाचारने दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. भाविकांनी सर्वात नजीकच्या गंगा घाटावर अमृतस्नान घ्यावं, असं आवाहन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केलं आहे. संगम नाक्यावर घडलेल्या दुर्घटनेनंतर बातमीदारांशी ते बोलत होते. प्रयागराज इथं आज सुमारे आठ ते दहा कोटी भाविक उपस्थित आहेत. भाविकांसाठी पंधरा ते वीस किलोमीटरच्या परिघात तात्पुरते घाट तयार केले असून भाविकांनी नजीकच्या घाटावर अमृतस्नान करावं, असं आवाहन त्यांनी केलं आहे. भाविकांच्या सुरक्षित स्नानासाठी प्रशाकीय यंत्रणा सातत्यानं कार्यरत असून नागरिकांनी सहकार्य करावं तसंच अफवांवर विश्वास ठेवू नये, असंही त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी घटनेची तात्काळ दखल घेतली असून भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि उत्तरप्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल देखील सातत्यानं परिस्थितीचा आढावा घेत असल्याचं योगी यावेळी म्हणाले. सध्या प्रयागराज मध्ये परिस्थिती नियंत्रणात असली तरी गर्दीचा दबाव कायम आहे, असं ते म्हणाले. गर्दीवरची उपाययोजना म्हणून सुरुवातीला सर्वसामान्य भाविक गंगेत स्नान करतील त्यानंतर आखाड्यातल्या सर्व साधूसंतांनी स्नान करण्याची तयारी दाखवली असल्याचं योगी यांनी सांगितलं. दरम्यान, प्रयागराज इथल्या महाकुंभात झालेली चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी असून त्यामध्ये जीवित हानी झालेल्या भाविकांच्या नातलगांप्रती शोक संवेदना व्यक्त करत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे. यामध्ये जखमी झालेले लवकर बरे व्हावेत, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाकुंभ इथं झालेल्या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. ज्या भाविकांनी त्यांचे नातेवाईक गमावले आहेत, त्यांच्याबद्दल तीव्र संवेदना असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरून म्हटलं आहे.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकारने उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारपासून सुरू होणार आहे. शुक्रवारी आर्थिक पाहणी अहवाल सादर होईल. शनिवारी १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर करतील. निर्मला सीतारामन यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाचं थेट प्रसारण आकाशवाणीहून होणार आहे. त्यामुळे आकाशवाणी मुंबईवरून दुपारी दीड वाजता प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र या भाषणानंतर प्रसारित होईल.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्त्रोनं एन व्ही एस झिरो टू हा उपग्रह घेऊन जाणाऱ्या  अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण केलं.  जीएसएलव्ही एफ - 15 हा प्रक्षेपक आज सकाळी सहा वाजून २३ मिनिटांनी श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून सोडण्यात आला.  इसरोतर्फे झालेलं हे शंभरावं अग्निबाण उड्डाण होतं. एनव्हीएस ओ टू हा उपग्रह त्याच्या कक्षेत स्थिरावला असून तो दूरसंचार, दिशादर्शन आणि हवामान शास्त्रासाठी उपयुक्त ठरणार आहे. इस्त्रोसाठी ही एक ऐतिहासिक कामगिरी आाहे, अशा शब्दात इस्त्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक २०२४ च्या संयुक्त संसदीय  समितीचा अहवाल आज मंजूर करण्यात आला. समितीमधल्या १४ दुरुस्त्या स्वीकारल्याचं समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी वार्ताहरांना सांगितलं. हा अहवाल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना उद्या सादर केला जाणार आहे. गेली सहा महिने या अहवालावर सखोल  चर्चा झाल्याचं जगदंबिका पाल यांनी सांगितलं. देशभरातील वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि नियमन सुधारणं हे या  विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

दरम्यान, विरोधी पक्षातल्या सदस्यांनी या अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. हा अहवाल घाईघाईत स्वीकारल्याचं द्रमुकचे नेते डी राजा म्हणाले. तृणमूल काँग्रसचे कल्याण बॅनर्जी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत यांनी अहवालाच्या विरोधात मतदान केलं.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. भाजपा, आम आदमी पार्टी आणि काँग्रेसमधले प्रमुख नेते त्यांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ रॅली, रोड शो करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज शाहदरा मतदारसंघातल्या करतार नगर इथे जाहीर सभा घेणार आहेत. आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा शर्मा, उत्तम नगर आणि करोलबागमधल्या सभेला संबोधित करतील. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी हे नजफगढ, बदरपूर, कालकाजी आणि ग्रेटर कैलासमध्ये जाहीर सभा घेणार आहेत. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी हे मटियाळा आणि विकासपुरी इथे तर केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर हे मोतीनगर, आर के पुरम आणि मेहरौली इथल्या सभांना संबोधित करतील. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढचे तीन दिवस निवडणूक प्रचारासाठी दिल्लीच्या दौऱ्यावर आहेत. ते आज रोहिणी इथे प्रचार सभा घेणार आहेत. त्यानंतर ते पहाडगंज परिसरात मराठी विभागाच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

आम आदमी पार्टीचे समन्वयक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे आज संध्याकाळी बदली आणि तिमारपूर मतदारसंघांत जाहीर सभा घेणार आहेत. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हे राजौरी बाग, टिळक नगर आणि विकासपुरी इथे रोड शो करणार आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी हे बवाना इथल्या सभेला संबोधित करणार आहेत.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आज काँग्रेस पक्षानं आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. दिल्ली प्रदेश काँग्रसच्या कार्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी जाहीरनाम्याविषयी माहिती दिली. हे संविधान जय बापू, जय भीम आणि जय संविधान या संकल्पनेवर आधारित असल्याचं जयराम रमेश म्हणाले. या जाहीरनाम्यात तरुण, महिला, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक, वाहतूक, आरोग्य अशा घटकांवर भर देण्यात आल्याची माहिती काँग्रेस नेते देवेंद्र यादव यांनी दिली. काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यास महिलांना दरमहा अडीच हजार रुपये तसंच, ५०० रुपयांत गॅस सिलिंडर आणि स्वयंपाकाचे जिन्नस मोफत मिळतील, सर्वांसाठी २५ लाखांचा आरोग्यविमा, नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांना अडीच हजार रुपयांचं विद्यावेतन मिळेल, ३०० युनिटपर्यंत मोफत वीज दिली जाईल, असं आश्वासन या जाहीरनाम्यात आहे.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष बेंजामीन नेत्यान्याहू यांना पुढच्या महिन्यात व्हाईट हाऊसमधे बैठकीसाठी आमंत्रित केलं आहे. ही बैठक ४ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचं नेत्यान्याहू यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. इस्रायल आणि शेजारी देशांमधे शांतता प्रस्थापित करणं तसंच अमेरिका आणि इस्रायल यांच्या समान प्रतिस्पर्ध्यांचा प्रतिकार करण्याबाबत या बैठकीत चर्चा होणार आहे. ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर अमेरिकेला भेट देणारे नेत्यान्याहू हे पहिलेच विदेशी नेते आहेत.

<><><><><>

एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमाचं महत्व अधोरेखित करणाऱ्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन उत्तराखंडमधे देहरादून इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

यांच्या हस्ते काल झालं. येत्या १४ फेब्रुवारीपर्यंत उत्तराखंडच्या ८ जिल्ह्यातल्या ११ शहरांमध्ये या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेत ३५ क्रीडा प्रकारांच्या एकूण ४७ स्पर्धांचा समावेश आहे.

<><><><><>

आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट मंडळाचे कार्यकारी प्रमुख ज्योफ अलार्डीस यांनी पदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतल्याचं आयसीसीनं सांगितलं आहे. क्रिकेट जगभरात पोहोचल्याबद्दल  आपल्याला अभिमान आहे, असं अलार्डीस यांनी आपल्या निरोपाच्या संदेशात म्हटलं आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय  शहा यांनी अलार्डीस यांचे आभार मानले तसंच अलार्डीस यांनी जागतिक स्तरावर क्रिकेट नेण्यात महत्वाची भूमिका निभावली, असं ते म्हणाले. यानंतर आसीसी नव्या कार्यकारी प्रमुखाची निवड करेल.

दरम्यान, पाकिस्तानात तयार होणाऱ्या अनेक स्टेडियमचं काम विलंबाने होत असून पुढल्या महिन्यात होऊ घातलेल्या स्पर्धेच्या वेळापत्रकालाही उशीर होत असल्याचं वृत्त आहे.

<><><><><>

इंडियन सुपर लीग फुटबॉल मध्ये आज संध्याकाळी गुवाहाटी इथं इंदिरा गांधी ॲथलॅटिक स्टेडियमवर नॉर्थईस्ट युनायटेड एफसी संघाचा  हैद्राबाद एफसी संघाविरुद्ध सामना होणार आहे. हा सामना आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. नॉर्थईस्ट युनायटेड एफसीनं सहा सामने जिंकले असून सात ड्रॉ केले आहेत. गुणतालिकेत हा संघ सध्या सहाव्या स्थानावर आहे. तर हैद्राबाद एफसी अंतिम स्थानावर आहे.

नवी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू स्टेडियम इथं काल झालेल्या सामन्यात जमशेदपूर एफसीनं पंजाब एफसीचा २-१ असा पराभव केला. मेन ऑफ स्टील

आता क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर आहे. जमशेदपूर एफसीनं ४१ व्या मिनिटाला प्रतीक चौधरीच्या नेतृत्वाखाली कोंडी फोडली आणि नंतर दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला जावी हर्नांडेझ या खेळाडूनं आघाडी घेतली. पंजाब फसीचा काल पराभव झाला असून हा त्यांचा सलग सातवा पराभव आहे.

**//<><><><><>//**